**<u>ठळक बातम्या</u>**

- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांचं उपोषण सुरू, न्यायालय आणि संविधानाच्या आधीन राहून निर्णय घेण्याची राज्य सरकारची भूमिका
- पुण्यात भेसळयुक्त दारू प्रकरणात पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे २२ कर्मचारी निलंबित
- राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ पूर्ण

**आणि**

- आयपीएलमध्ये उद्या गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम लढत

**<><><><><>**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मनोज जरांगे यांनी आजपासून अंतरवालीत पुन्हा बेमुदत उपोषण सुरु केलं. मराठा-कुणबी मंत्रालय सुरू करा, सातारा संस्थानचा जीआर काढा, गॅझेटियरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, जात वैधता प्रमाणपत्र द्या आदी मागण्या त्यांनी केल्या आहे. नाही दिली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असा आदेश काढावा, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. राज्य सरकारमधले मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह शिष्टमंडळानं काल आणि आज जरांगे यांची भेट घेतली. त्यांनी एक मसुदा सादर करुन आवश्यक सूचना करण्याची विनंती जरांगे यांना केली. त्यावर अधिकृत शासन आदेश जारी होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही अशी भूमिका जरांगे यांनी घेतली.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारची भूमिका सकारात्मक आणि पारदर्शक आहे. न्यायालयीन निर्णय आणि संविधान याच्या चौकटीत राहूनच सर्व निर्णय

घेतले जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नागपूरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पूर्व नागपुरात भांडेवाडी इथे नव्याने सुरु झालेल्या शहरी घनकचरा प्रक्रिया केंद्राची पाहणी केली. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु झालेला हा देशातला पहिला खासगी गुंतवणुकीचा ड्राय डायजेशन प्रकल्प असल्याचं त्यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं. यात भारतीय आणि नेदरलँडच्या खाजगी कंपन्यांची ३०० कोटी रुपयांची गुंतवणुक आहे. प्रकल्पात दरदिवशी बाराशे टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करून दर दिवशी २८ टन ज्वलनशील वायू, १२० टन सेंद्रिय खत आणि ४०० टन आरडीएफ इंधनाची निर्मिती होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालू झाल्यावर वर्षभरात शहरातला कचऱ्याचा ढीग संपेल आणि त्याखालची जमीन इतर वापरासाठी उपलब्ध होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि महापौर निता ठाकरे उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि इतर मान्यवरांच्या हस्ते यावेळी वृक्षारोपण झालं.

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधान परिषद निवडणुकीअंतर्गत कोकण विधान परिषद मतदारसंघासाठी शेतकरी कामगार पक्षानं पनवेल महानगरपालिकेतले विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान महायुतीकडून अद्यापही या मतदारसंघाबद्दल निर्णय झालेला नसला, तरी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांकडून निवडणुकीची तयारी सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

पुणे इथे भेसळयुक्त दारू प्यायल्यामुळे १४ जणांचा मृत्यू झाल्या प्रकरणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस विभाग तसंच, राज्य उत्पादन शुल्क विभाग अशा एकूण २२ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. भेसळयुक्त दारूच्या अवैध पुरवठ्याला आळा घालण्यासाठी अपयशी ठरल्याबद्दल ही कारवाई झाली आहे. यात ९ पोलीस कर्मचारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रकरणात आतापर्यंत ८ जणांना अटक करण्यात आली असून तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे.

**<><><><><>**

कृषी विभागाच्या पथकानं आज पहाटे गुजरातमधून धुळे जिल्ह्यात  आणलेल्या संशयित प्रतिबंधित कापूस बियाण्यांचा साठा जप्त केला. या कारवाईदरम्यान कापसाच्या धनुष्य आणि फाल्कन या वाणांच्या बियाण्यांची  २१ पाकिटं  जप्त करण्यात आली असून या बियाण्यांची किंमत सुमारे ३१ हजार ३०० रुपये इतकी आहे. या प्रकरणी कृषी अधिकाऱ्यांनी धुळे शहर पोलिस ठाण्यात सरकारी फिर्याद नोंदवली  आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ आज पुण्यात खडकवासला इथं झाला. या तुकडीत १८ महिला कॅडेट्ससह ३५३ कॅडेट्सनी आपले प्रशिक्षण पूर्ण केलं. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे पुनरीक्षण अधिकारी म्हणून या सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केलं. सध्याच्या वेगानं बदलत असलेल्या सुरक्षा विषयक वातावरणात सातत्यानं शिकत राहणं, परिस्थितीनुसार जुळवून घेणं आणि सकारात्मक दृष्टिकोन बाळगणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. सैनिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणं आणि त्यांचा विश्वास संपादन करणं हीच नेतृत्वाची खरी कसोटी असल्याचंही ते म्हणाले. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिला कॅडेट्सच्या कामगिरीचंही

त्यांनी कौतुक केलं. शौर्य, जिद्द आणि लष्करी उत्कृष्टता या गुणांना लिंगभेद नसतो असं ते म्हणाले. यानिमीत्तानं त्यांनी सर्व कॅडेट्स, त्यांचे कुटुंबीय, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांचं अभिनंदनही केलं. ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू असल्याचं ते या सोहळ्यानंतर बातमीदारांशी बोलताना म्हणाले. भविष्यातली युद्धं केवळ जमीन, समुद्र आणि हवाई क्षेत्रापुरती मर्यादित नसतील तर त्यात सायबर, अंतराळ आणि कॉग्निटिव्ह वॉरफेअरची भूमिकाही महत्त्वाची असेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात लढत होणार आहे. काल राजस्थान रॉयल्स विरुद्ध झालेल्या सामन्यात गुजरातच्या संघाने राजस्थानवर ७ गडी राखून विजय मिळवला. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून २१६ धावा केल्या होत्या. गुजरातने हे लक्ष्य एकोणिसाव्या षटकातच ७ गडी राखून पूर्ण केलं.

**<><><><><>**

सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारतीय खेळाडू ध्रुव कपिला आणि तनीशा क्रास्टो यांची लढत जपानच्या सायका होबारा आणि युइची शिमोगामी जोडीशी होणार आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत या दोघांनी मलेशियन जोडीला पराभूत केलं.

याच स्पर्धेत दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने मलेशियन जोडीला पराभूत केलं. उपांत्यफेरीत त्यांची लढत दक्षिण कोरियाच्या खेळाडूंशी होणार आहे.

**<><><><><>**

देशाचे संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आज सेवानिवृत्त झाले. देशाचे सर्वोच्च सैन्य अधिकारीपदाच्या त्यांच्या कार्यकाळाच्या समाप्तीचं प्रतीक म्हणून, नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांनी त्यांना गार्ड ऑफ ऑनर

दिला. यानंतर चौहान यांनी युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं. तिन्ही दलांच्या गार्ड ऑफ ऑनरनं सेवानिवृत्त होणं ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची भावना चौहान यांनी यावेळी व्यक्त केली. आपला कार्यकाळ समाधानकारक आणि उत्कृष्ट असल्याचंही ते म्हणाले.

चौहान हे १९८१ मध्ये भारतीय लष्करात रुजु झाले होते, त्यांनी ४० वर्षांपेक्षा जास्त काळ लष्करात सेवा दिली. या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या सेवेसाठी त्यांना परम विशिष्ट सेवा पदकासह अनेक पदकांनी सन्मानितही केलं गेलं.

चौहान यांच्यानंतर लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे नवे संरक्षण दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

**<><><><><>**

आज गोवा राज्याचा ४० वा स्थापना दिवस. आजच्याच दिवशी १९८७ मध्ये गोव्याला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला होता. गोवा राज्याच्या स्थापना दिवसानिमित्त  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी गोव्याच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

समृद्ध अशी सांस्कृतिक परंपरा आणि अतिथ्यशिलतेसाठी गोवा राज्य ओळखले जातं. त्याबरोबरच शिक्षण, उद्योग, स्टार्टअप आणि राज्यात सातत्यानं होत असलेल्या विकास कामांमुळे गोव्यानं देशात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे, असं राष्ट्रपतींनी संदेशात म्हटलं आहे. गोवा राज्याच्या प्रगतीसाठी ज्यांनी योगदान दिलं त्या सर्वांचं स्मरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात केलं..

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून गोव्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, पणजी इथल्या कला अकदामीत राज्याच्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपराष्ट्रपती

सी.पी. राधाकृष्णन उपस्थित होते. गोवा राज्य हे देशातलं आदर्श राज्य असून या राज्यानं विकासाबरोबरच आपला समृद्ध असा सांस्कृतिक वारशाचं जतन केल्याचे गौरवोद्गार राधाकृष्णन यांनी काढले.

**<><><><><>**

राज्याचे माहिती, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते काल मुंबई इथं झालेल्या एका कार्यक्रमात ‘किस्सा शुरू टॉकीज’ या उपक्रमांचा प्रारंभ झाला. राज्यातल्या अनेक गावांमध्ये आजही चित्रपटगृहांची सुविधा उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून थेट ग्रामीण प्रेक्षकांपर्यंत नवीन चित्रपट पोहोचवण्याच्या उद्देशानं हा उपक्रम सुरु केला गेला आहे.

//<><><><><>//